**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बांद्रा-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास विषयक प्रस्तावामधील प्रस्तावित फेरबदलाबाबत कलम ३७(१कक) खालील सूचना.....

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
क्रमांक :- टिपीबी ४३१६ /१०६९/ प्र.क्र. ७२/ २०१७/ नवि-११
मंत्रालय, मुंबई : ४०० ३२,
दिनांक – **७ जून, २०१७.**

**शासन निर्णय :** सोबतची **मराठी व इंग्रजी** सूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( श्रीरंग दि. लांडगे )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

प्रति,

(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
(२) आयुक्त, बृहन्मुंबई महागनरपालिका.
(३) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन.
(४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(५) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(६) उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.

२/- सदर सूचना शासनाच्या दिनांक १३.९.२०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालीलप्रमाणे जाहिरात म्हणून प्रसिध्द करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | जाहिरात देणा-या कार्यालयाचे नांव | नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबइ-३२. |
| २) | जाहिरात कोणत्या दिनांकास द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३) | प्रसिध्दीचे स्वरुप | स्थानिक |
| ४) | कोणत्या जिल्हयामध्ये | बृहन्मुंबई महागनरपालिका क्षेत्रामध्ये |
| ५) | किती वृत्तपत्रात | एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६) | वृत्तपत्राचे नांव | सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात |

| | | |
|---|---|---|
| ७) | किती वेळा | एकदा |
| ८) | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिका-याकडे पाठवावयाचे त्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता | व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इमारत, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा(पूर्व), मुंबई ४०० ०५१. |

(७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची मराठी व इंग्रजी शासकीय सूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)

(८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी)

(९) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

**Proposed modification to the Sanctioned Planning Proposal of Bandra-Kurla Complex Notified Area under Section 37 (1AA) of the Act..**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumabi 400 032.**
**Dated : 7TH June, 2017.**

**NOTICE**

**No.TPB 4316/1069/CR-72/2017/UD-11:**

Whereas, the Government in Urban Development and Public Health Department vide Notification No. BKR 1177/262-UD-5, dated 7th March, 1977 under clause (c) of sub-section (1) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority to be the Special Planning Authority for the Notified Area of Bandra-Kurla Complex (hereinafter referred to as its acronym "BKC") ;

And whereas, the State Government in Urban Development Department and Public Health Department vide Notification No. BKR 1177/262-UD-5, dated 9th April, 1979, under clause (d) of sub-section (3) of Section 40 of the said Act, has approved the Planning Proposals (hereinafter referred to as "the said Plan") with the Development Control Regulations, submitted by the Mumbai Metropolitan Region Development Authority for the development of lands in the BKC;

And whereas, the Mumbai Metropolitan Region Development Authority is implementing Mumbai Metro Master plan through Special purpose Vehicle Company viz. "Mumbai Metro Rail Corporation Limited( hereinafter referred to as "the said Authority" );

And whereas, the said Authority has requested that the land bearing CTS No. 629 (pt.) admeasuring about 809 Sq.mtr. out of Reservation of **Social Facility** as per sanctioned Planning Proposal of 'F' Block of BKC Notified Area (hereinafter referred to as "the said land), is required for underground Metro Station namely **Vidyanagari** on Metro line-III and also requested to reserve the said land for **Metrorail Station and Allied Uses** in the said plan;

And whereas, considering the above facts and circumstances, the State Government is of opinion that it is necessary to carry out urgently modification to the said Plan, to delete the said land from Reservation of **Social Facility** and to

reserve it for the purpose of **Metrorail Station and Allied Uses** (hereinafter referred to as "the proposed modification "and more specifically mentioned below )

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of powers vested in it under sub-section (1AA) of Section 37 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, the Government hereby publishes a Notice for inviting suggestions and objections from any person with respect to proposed modification, as required by clause (a) of sub-section (1AA) of Section 37, within period of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

Any objections/ suggestions in respect of the proposed modification may be forwarded before the expiry of one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette, to the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001. Any objection or suggestion, which may be received by the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai within the said period shall be dealt with in accordance with the provisions of the said sub-section (1AA) of Section 37.

**Proposed Modification**

"The area about 809 Sq.mtr. of land bearing CTS No. 629(part), out of Reservation of "**Social Facility"** as per sanctioned Planning Proposal of 'F' Block of BKC Notified Area, is proposed to be deleted and be reserved for" **Metrorail Station and Allied Uses.** The Appropriate Authority for development of the said reservation shall be " **Mumbai Metro Rail Corporation limited** "

A Notice and Plan showing the proposed modification shall be kept open for inspection by the general public during the office hours on all working days at following places :-

(1) Office of the Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051.

(2) Office of the Deputy Director of Town Planning., Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400001.

This Notice shall also be available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**( Kishor D.Girolla )**
**Under Secretary to Government.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बांद्रा-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास विषयक प्रस्तावामधील प्रस्तावित फेरबदलाबाबत कलम ३७(१कक) खालील सूचना....

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
दिनांक ६ **जून २०१७**

**क्रमांक :- टिपीबी ४३१६ /१०६९/ प्र.क्र. ७२/ २०१७/ नवि-११**

**सूचना**

ज्याअर्थी, शासन नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र. बीकेआर ११७७/२६२-युडी-५ दिनांक ७ मार्च १९७७ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम ४० च्या पोटकलम १ च्या खंड (ग) अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बांद्रा-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे याचा उल्लेख "बीकेसी अधिसूचित क्षेत्र" असा केलेला आहे) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र. बीकेआर ११७७/२६२-युडी-५ दिनांक ९ एप्रिल १९७९ नुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बीकेसी अधिसूचित क्षेत्राचे विकास नियंत्रण नियमावलीसह सादर केलेले विकास विषयक प्रस्ताव (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त योजना " असा करण्यात आला आहे.) उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोटकलम ३ च्या खंड (घ) मधील तरतूदीनुसार मंजूर केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे मुंबई मेट्रो रेल्वेची योजना विशेष हेतू वाहन कंपनी मुंबई मेट्रो कार्पोरेशन लिमिटेड (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्राधिकरण" असा केलेला आहे) यांचे माध्यमातून राबवित आहे;

आणि ज्याअर्थी उक्त प्राधिकरणाने नगर भूमापन क्र. ६२९(भाग) मधील बीकेसी अधिसूचित क्षेत्राच्या उक्त विकास योजनेमधील " एफ " ब्लॉकमधील सार्वजनिक सुविधा आरक्षणाखाली असलेल्या क्षेत्रामधील ८०९ चौ.मी. क्षेत्र ( यापुढे याचा उल्लेख " उक्त जमिन " असा केलेला आहे) हे मेट्रो लाईन-III च्या भूयारी मार्गावरील **विदयानगरी स्टेशन** साठी आवश्यक असलेचे कळविलेले असून सदर क्षेत्र हे **मेट्रो रेल स्टेशन आणि अनुषंगिक वापर** याकरिता आरक्षित करावे अशीही विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता, शासनाचे असे मत झाले आहे की, उक्त जमिन **सार्वजनिक सुविधा** या आरक्षणातून वगळून **मेट्रो रेल स्टेशन आणि अनुषंगिक वापर**

याकरिता आरक्षित करणेसाठी तातडीने उक्त योजनेमध्ये खाली विशेषत्त्वाने नमूद केलेप्रमाणे फेरबदल(यापुढे याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा खाली नमूद केलेप्रमाणे करण्यात आला आहे ) करणे आवश्यक झालेले आहे;

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासन याद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७, पोट कलम (१कक) चे खंड(क) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून सदरची सूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीमध्ये सूचना/हरकती मागविण्यासाठी, सूचना प्रसिध्द करीत आहे;

शासनाकडून असेही कळविणेत येत आहे की, प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकत/सूचना शासन राजपत्रात सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या कार्यालयाचे पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांच्याकडे सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर कलम ३७च्या पोट कलम (१कक) अन्वये कार्यवाही करण्यात येईल;

**प्रस्तावित फेरबदल**

" बांद्रा-कुर्ला अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास विषयक प्रस्तावाचे एफ ब्लॉक मधील, नगर भूमापन क्र. ६२९(भाग) मधील, " **सार्वजनिक सुविधा** " या आरक्षणामधील सुमारे ८०९ चौ.मी. क्षेत्र हे सदर आरक्षणामधून वगळून "**मेट्रो रेल स्टेशन आणि अनुषंगिक वापर**" याकरिता आरक्षित करणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. सदर आरक्षणासाठी मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन हे समुचित प्राधिकरण रहाणार आहे."

प्रस्तुत सूचना व प्रस्तावित फेरबदलाचा नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये खालील ठिकाणी उपलब्ध राहिल.

1) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रे-कुर्ला संकुल, बांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१.
2) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांचेकडे इन्सा हटमेंटस, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर द.गिरोल्ला)
**शासनाचे अवर सचिव.**